-29-

विधानमंडळाशी संबंधित असलेले
कामकाज हाताळण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक , क्रमांक एलबीडी १८९१/[२६२/९१]अ-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- २२ जानेवारी, १९९२

पहावे:- [१] शासनाचे महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण १०८९/प्र.क्र.९३/म-५, दि. १५-७-१९८९.

[२] शासन दूरमुद्रित संदेश क्र. विमका ३९१/ प्र.क्र. ६८/म-५, दि. ५-३-१९९१.

[३] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. विमका-३९१/ प्र.क्र. ६८/म-५, दि. १४ मार्च, १९९१.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
30 JAN 1992
शाखा-
मु.लि. नि.उ. जि.

शासन परिपत्रक

विधानमंडळाच्या अधिवेशनाच्या कालावधीत आमदार महोदयांकडून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्व असलेल्या विविध बाबींवर विधानसभा/विधानपरिषद प्रश्न विचारित असतात व असे प्रश्न शासन स्तरावर प्राप्त झाल्यावर त्या संबंधीचा स्वयंपूर्ण अहवाल शासनास सादर करण्याच्या दृष्टीने संबंधित जिल्हाधिका-यांकडून माहिती/अहवाल मागविण्यात येत असतात. असे अहवाल मागविण्यामागची शासनाची, जिल्हाधिका-यांकडून, अशी अपेक्षा असते की, अंतिमरित्या या प्रश्नाबाबतची उत्तरे स्वत: मंत्री महोदयांना द्यावी लागत असल्यामुळे जिल्हाधिकारी व्यक्तीश: अशी प्रकरणे हाताळून प्रश्नात उपस्थित केलेल्या विषयाबाबतचा स्वयंपूर्ण, अद्ययावत, मुद्देसूद अहवाल शासनास सादर करतील. कारण , शासनामार्फत अशा प्रश्नांची उत्तरे देखील अचूक व मुद्देसूद पाठविणे आवश्यक असते. एवढेच नव्हे तर, जेंव्हा सभागृहात प्रश्न प्रत्यक्षात चर्चिला जातो त्यावेळी आमदार महोदयांव्दारा विचारण्यात येणा-या उपप्रश्नांच्या उत्तरासाठी देखील पूरक टिप्पणी तयार करून ती मंत्री महोदयांच्या उपयोगासाठी देणे आवश्यक असते.

२. असे असताना देखील, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, बहुतांशी प्रकरणात विधानमंडळाच्या कामकाजाविषयीची प्रकरणे जिल्हाधिका-यांव्दारा व्यक्तिश: हाताळली न जाता ही जिल्हाधिका-यांव्दारा उपविभागी जिल्हाधिकारी किंवा इतर अधिका-यांकडे सोपविण्यात येतात व या अधिका-यांच्या सहीने जे अहवाल अथवा माहिती शासनास प्राप्त होते ती अपूर्ण, त्रोटक व असमाधानकारक असते. एवढेच नव्हे तर, क्षेत्रीय अधिका-यांनी सादर केलेला प्राथमिक अहवाल पुष्कळ वेळा न तपासता जसाच्यातसा शासनास पाठविला जातो व अशा या मूळ अहवालातील ह पुष्कळ वेळा वस्तुस्थितीजन्य

माहिती देखील तपासण्याची काळजी घेण्यांत येत नाही.

३. विधानमंडळाकडून शासन स्तरावर असे प्रश्न प्राप्त झाल्यापासून सर्वसाधारणपणे ३ आठवडयाच्या आतच विधानमंडळास उत्तरे पाठवावयाची असल्यामुळे व या कालावधीत जिल्हाधिका-यांकडून अहवाल प्राप्त होत नसल्यामुळे उत्तरे पाठविण्याची वेळ टळून गेल्यावर पुष्कळ वेळा असे अहवाल प्राप्त होतात व ते सुध्दा त्रोटक, असमाधानकारक व अपूर्ण असल्यामुळे शासनास तारांकित प्रश्नांची उत्तरे वेळेवर विधानमंडळास पाठविण्यास शक्य होत नाही. एवढेच नव्हे तर, जिल्हाधिका-यांकडून प्राप्त झालेल्या अहवालातील त्रूटी दूर करुन घेण्याच्या दृष्टीने दूरध्वनी, दूरमुद्रित संदेश, तारा यांचा शासनास आधार घ्यावा लागतो. या सर्व कारणांमुळे विधानमंडळाच्या अधिवेशनाच्या कालावधित विचारण्यात येणा-या प्रश्नांची उत्तरे वेळेवर पाठविणे व मंत्री महोदयांच्या उपयोगासाठी आवश्यक असलेल्या पूरक प्रश्नांच्या उत्तराची टिप्पणी तयार करणे शासन स्तरावर अशक्य होऊन बसते व त्यामुळे ब-याच वेळा शासनाची नाचक्की होण्याची शक्यता असते. अशा प्रकारांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने शासनाचे असे आदेश आहेत की, विधानमंडळाशी संबंधित असलेल्या कामकाजामध्ये विशेषतः करून तारांकित/अतारांकित प्रश्न लक्षवेधी सूचना इ. च्या संबंधिची सर्व प्रकरणे जिल्हाधिका-यांनी व्यक्तिशः हाताळावीत व खाली दर्शविल्यानुसार कार्यवाही करावी:-

[१] शासनाकडून प्रश्नाची प्रत. अहवाल पाठविण्याच्या विनंतीसह प्राप्त झाल्यावर, जिल्हाधिका-यांनी प्रश्नाची प्रत संबंधित स्थानिक अधिका-यांना जशीच्या तशी न पाठवता, प्रश्नात उपस्थित केलेल्या प्रकरणाचा सर्वप्रथम सखोल अभ्यास करावा. शासकीय अभिलेखात उपलब्ध असलेल्या माहितीव्यतिरिक्त प्रश्नाधिन प्रकरणासंबंधिची अद्यावत माहिती विधानसभा/विधानपरिषद सदस्यांकडे उपलब्ध असते याची जाणीव ठेवून, स्थानिक अधिका-यांकडून अद्यावत माहिती मिळविण्याच्या दृष्टीने एक प्रश्नावली तयार करावी. व या प्रश्नावलीच्या अनुषंगाने अद्यावत अहवाल सादर करण्याच्या सूचना संबंधित स्थानिक अधिका-यांना द्याव्यात. अशा प्रश्नावलीत प्रश्नाधिन प्रकरणाची पार्श्वभूमि देखील विचारुन घ्यावी. प्रश्नाधिन प्रकरण संबंधितांच्या अर्जावर वा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीवर आधारीत असेल तर अशा अर्जाच्या वा वृत्तपत्राच्या कात्रणाची प्रत सादर करण्याच्या सूचना स्थानिक अधिका-यांना द्याव्यात.

[२] भूसंपादनाशी संबंधित असलेल्या प्रकरणांच्या बाबतीत ही बाब प्रकर्षाने शासनाच्या नजरेस आली आहे की, भूसंपादक संस्था परस्पर वाटाघाटीने खाजगी जमिनीचा ताबा घेऊन, त्या जमिनीवर प्रकल्प उभारणी देखील करतात. मात्र, भूसंपादनाचा प्रस्ताव वेळीच जिल्हाधिका-यांना क सादर करीत नाहीत. भूसंपादनाचा प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याने, निरंक अहवाल पाठविण्याकडे जिल्हाधिका-यांचा कल असतो. या प्रथेस त्वरित पायबंध घालणे अत्यावश्यक आहे. प्रश्नाधिन प्रकरणात महसूल विभागा व्यतिरिक्त अन्य प्रशासकीय विभागांचा संबंध असेल असेल तर अन्य प्रशासकीय विभागांशी संबंधित असलेली माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारचे अहवाल देण्याचे कटाक्षाने टाळणे आवश्यक आहे. प्रशासकीय विभाग जरी विविध असले तरी शासन शेवटी

-31-

एकच असल्यामुळे अन्य प्रशासकीय विभागाची माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारचे उत्तर मा.महसूल मंत्र्यांना सभागृहात देता येत नाही. त्यामुळे ज्या प्रकरणांशी अन्य प्रशासकीय विभागांचा संबंध असेल त्या प्रशासकीय विभागांच्या स्थानिक अधिका-यांशी त्वरित संपर्क साधून, त्यांच्या विभागाशी संबंधित असलेली माहिती देखील जिल्हाधिका-यांनी मिळवावी वा अशी माहिती मिळवून स्वयंपूर्ण अहवाल सादर करण्याचे आदेश स्थानिक अधिका-यांना द्यावेत.

[३] स्वत:ची बुध्दीमत्ता व अनुभवाचा वापर करून विधानसभेत/परिषदेत प्रश्नाच्या चर्चेच्यावेळी कोणते पूरक प्रश्न विचारण्यात येण्याची शक्यता आहे याचा देखील विचार करून अशा पूरक प्रश्नांचा, वर उल्लेखिलेल्या प्रश्नावलीत समावेश करण्यात यावा.

[४] प्रश्नात एखाद्या अर्जाचा उल्लेख केला असेल व असा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त झाला नसेल तर स्थानिक अधिका-यांकडून माहिती मागविण्याच्या वेळीच, एक स्वतंत्र संदर्भ विभागीय आयुक्तांना करून, त्यांच्या कार्यालयात अर्ज प्राप्त झाला आहे किंवा कसे याची कसोशीने चौकशी करावी.

[५] प्रश्नाधिन प्रकरणात घडलेल्या घटना, स्थानिक वा अन्य अधिका-यांव्दारे केलेल्या कार्यवाहीचा अद्यावत व तारीखवार अहवाल सादर करण्याच्या सूचना स्थानिक अधिका-यांना द्याव्यात प्रश्नाधिन प्रकरणात गुंतलेल्या संबंधित व्यक्तींची नावे तसेच, संबंधित प्रकरण हाताळणा-या अधिका-यांची नावे व त्यांचा सेवा कालखंड नमूद करणे आवश्यक आहे.

[६] प्रश्नाधिन प्रकरणात एखाद्या शासकीय अधिका-यांविरुध्द चौकशी चालू असेल तर अशा चौकशीत गुंतलेल्या अधिका-यांची नावे व त्यांचा त्या विशिष्ट पदावरील सेवा कालखंड आदि बाबत सविस्तर माहिती द्यावी.

[७] स्थानिक अधिका-यांकडून अहवाल प्राप्त झाल्यावर असा अहवाल जशाच्या तसा शासनास सादर न करता जबाबदार अधिका-यांकडून अशा अहवालाची छाननी करून घ्यावी. अहवाल परिपूर्ण नसल्यास संबंधित स्थानिक अधिका-यांशी संपर्क साधून अहवाल परिपूर्ण करून घेण्यात यावा व सर्व बाजूंनी परिपूर्ण असा अहवाल सादर करण्यात आला आहे. याची खात्री करून घेऊन तसेच सांख्यिकी अहवालात कोणतीही तफावत नाही अशी खात्री करून घेतल्यावरच जिल्हाधिका-यांनी असा अहवाल शासनास सादर करावा जेणे करून शासन स्तरावर अहवाल प्राप्त झाल्यावर शासनास अहवालातील त्रुटीबाबत कोणतीही पुन्हा संदर्भ करावा लागणार नाही.

.........

[८] प्रश्नाधिन प्रकरणांसंबंधिचे पुष्कळसे अहवाल अनुमानावर आधारित असतात. जसे "वाटते", "दिसते", इत्यादि. शेवटी शासकीय यंत्रणेवरच शासनाचा क्षेत्रीय स्तरावर कारभार चालला असल्यामुळे शासकीय अधिका-यांकडून निश्चित अशा वस्तुस्थितीजन्य अहवालाची मा. सदस्यांची अपेक्षा असते. त्यामुळे यापुढे अनुमानावर आधारित असा कोणताही अहवाल जिल्हाधिका-यांनी शासनास सादर करु नये. तर, निश्चित असा अद्यावत वस्तुस्थितीजन्य अहवाल शासनास सादर करावा.

[९] कांही अत्यंत महत्त्वाच्या/तातडीच्या कामानिमित्त जिल्हाधिका-यांना आपले मुख्यालय सोडणे भाग पडले असेल व या कालावधित प्रश्नाची उत्तरे शासनास सादर करावयाची असतील तर अशा प्रसंगी, प्रश्नाच्या उत्तराचे प्रारुप मान्य करण्याची जबाबदारी जिल्हाधिका-यांनी लेखी स्वरुपात एखादा जबाबदार अधिका-यांकडे सोपवावी. मात्र, मुख्यालयास परतल्यावर शासनास पाठविण्यात आलेले अहवाल तपासून ते [illegible], मुद्देसूद व परिपूर्ण असल्याची खातरजमा जिल्हाधिका-यांनी व्यक्तीशः करावी व तशी नोंद संबंधित प्रकरणांवर ठेवावी.

[१०] यापुढे याबाबतीत कोणत्याही प्रकरणात प्रश्नांची उत्तरे व संभाव्य उपप्रश्नांच्या उत्तरासाठी लागणारी पुरवणी टिप्पणी जिल्हाधिका-यांनी व्यक्तिशः लक्ष घालून पाठविलेली नाही असे आढळल्यास वा शासन स्तरावर प्राप्त झालेला अहवाल परिपूर्ण नसल्याचे आढळल्याने एखादा प्रकरणात शासनास त्रूटीबाबत जिल्हाधिका-यांकडे पुन्हा विचारणा करावी लागल्यास, या बाबीची शासनाव्दारे गंभीर दखल घेण्यात येईल व जिल्हाधिका-यांच्या गोपनीय अहवालात "विधान मंडळाचे कामकाज बेजबाबदार व अकार्यक्षमरित्या हाताळणारे अधिकारी" असा शेरा नोंदविण्यात येईल. या व्यतिरिक्त आवश्यक त्या प्रकरणात संबंधित जिल्हाधिका-यांविरुध्द खातेनिहाय चौकशीची कार्यवाहीसुध्दा करण्यात येईल.

[११] "जिल्हाधिकारी" हा शासन यंत्रणेचा कणा असल्यामुळे, प्रकरणाचे गांभीर्य ओळखून यापुढे विधान मंडळाशी संबंधित असलेले कामकाज जिल्हाधिकारी सर्व प्राथम्याने व अत्यंत काळजीपूर्वक हाताळतील व या कामकाजाशी संबंधित अहवाल त्यांनी शासनास सादर केल्यावर अशा अहवालात कोणतीही त्रूटी काढण्यास शासनास वाव राहणार नाही याची दक्षता घेतील व त्यांच्या विरुध्द कोणतीही कार्यवाही करण्याची संधी ते शासनास देणार नाहीत अशी शासनाची रास्त अपेक्षा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

[signature]

[ एस. आर. काकोडकर ]

TCY
[illegible]
7-2-92